| | | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक : | ०९.१२.२०१५ | | |
| | नोंदणी दिनांक : | ०९.१२.२०१५ | | |
| | निकाल दिनांक : | ०५.०८.२०२६ | | |
| | कालावधी : | वर्षे | महिना | दिवस |
| | | १० | ०७ | २७ |

**भद्रावती, जि. चंद्रपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २)**

**यांच्या न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी : श्रीमती ए. आर. देवरे)

**नि. फौ. ख. क्र. ७००२०२/२०१५** **निशाणी क्र. ५१**

**शासन –वि.– जयप्रकाश राम + १**

CNR No. MHCH070015402015

**प्रथम खबरी अहवालाचे विवरण**

अपराध क्रमांक –२३/२०१५ दिनांक – १०.०७.२०१५

पोलीस ठाणे, माजरी.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी/अभियोग पक्ष** | – | महाराष्ट्र शासन, द्वारा पोलीस ठाणे अधिकारी, माजरी पोलीस ठाणे, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. |
| **अभियोग पक्षातर्फे** | – | कु. एम.एन. भुजाडे, विशेष सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | – | १. जयप्रकाश विक्रमा राम, वय–३० वर्षे, धंदा– मजूरी, रा. न्यू हाउसिंग कॉलनी, खदान नं.२ माजरी कॉलरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर,<br>२. बंडु महादेव उपरे, वय–३० वर्षे, धंदा– मजूरी, रा. चालबर्डी (को.), ता. भद्रावती, जि.चंद्रपूर, |
| **विधीज्ञ** | – | श्रीमती एस.व्ही. वडारकर, आरोपी क्र.१ करीता. |

| | | |
|---|---|---|
| | | श्री. आर.एन. पथाडे, आरोपी क्र.२ करीता. |

| | |
|---|---|
| अपराधाचा दिनांक – ३०.०६.२०१५ | प्रथम खबरी अहवाल दिनांक – १०.०७.२०१५ |
| आरोपपत्र दाखल दिनांक – ०८.१२.२०१५ | आरोप निश्चिती दिनांक – १७.१०.२०२४ |
| साक्षीपूरावा सुरु होण्याचा दिनांक– १५.१०.२०२५ | निकाल राखून ठेवल्याचा दिनांक – ०५.०८.२०२६ |
| निकाल दिनांक – ०५.०८.२०२६ | शिक्षेचा आदेश दिनांक – निरंक |

**आरोपींचे विवरण**

| अ.क्र. | आरोपींची नावे | अटक दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | अपराध | निर्दोष मुक्तता अथवा दोषसिध्दी | ठोठावण्यात आलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जयप्रकाश विक्रमा राम | १०.०७.२०१५ | १२.०७.२०१५ | भा.दं.वि.चे कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक |
| २. | बंडु महादेव उपरे | ११.०७.२०१५ | १२.०७.२०१५ | --"-- | निर्दोष मुक्तता | निरंक |

**अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांची यादी**

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| १. | मुमताज अहमद शेख सिध्दीकी (नि.क्र.४९) | पंच साक्षीदार |

**बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक**

| अ.क्र. | निशाणी क्र. | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | ५० | सा.क्र.१ मुमताज सिध्दीकी यांची घटनास्थळ पंचनाम्यावरील सही. |

**बचाव पक्षाने मान्य केलेली कागदपत्रे**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

| बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक | | |
|---|---|---|
| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
| | निरंक | निरंक |

| न्यायालयाचे निशाणी क्रमांक | | |
|---|---|---|
| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
| १. | ४६ | दोषारोप |
| २. | ४७ व ४८ | आरोपी क्र.१ व २ यांचे दोषारोप पत्राबाबतचे निवेदन. |

| वस्तू | | |
|---|---|---|
| क्रमांक | वस्तू क्रमांक | विवरण |
| १. | | १) एक काळ्या रंगाची दोन सिंगे म्हैस, किंमत रु.३५०००/–<br>२) एक लहान काळ्या रंगाचे वगार कपाळावर पांढरा डाग असलेला, किंमत रु.५००/– |

## <u>न्यायनिर्णय</u>

(जाहीर दिनांक ०५.०८.२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाच्या कलम ३७९ सहकलम ३४ खालील अपराधांकरीता खटला चालविण्यात आला असून अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

०२. फिर्यादी तेतरादेवी चंद्रीका साव उर्फ गोंड हिने दिनांक १०.०७.२०१५ रोजी पोलीस ठाणे, माजरी येथे रिपोर्ट दिला की, त्यांनी दिनांक ३०.०६.२०१५ रोजी ९.००

वाजता घराच्या जवळ म्हैस व म्हशीचे वगार चरण्याकरीता सोडले होते. रात्री झाली असता म्हैस व म्हशीचे वगार घरी परत आले नसल्याने तिने आजूबाजूला गावामध्ये तसेच कांजीमध्ये पाहणी केली, परंतू ते मिळून आले नाही. त्यानंतर फिर्यादीने सदरची माहीती बंडू चोपने, राह. कुचना तसेच सुभाष दलाल, राह. वणी यांना दिली. दिनांक ०९.०७.२०१५ रोजी दुपारी अंदाजे ३.०० वाजेच्या सुमारास सुभाष दलाल यांनी फोनवरुन सांगितले की, त्यांची म्हैस व म्हशीचे वगार हे वणी येथील जत्रा मैदान येथे जयप्रकाश याने आणले आहे. त्यानंतर फिर्यादी व तिचा मुलगा विजय असे मिळून जत्रा मैदान, वणी येथे गेले असता त्यांची म्हैस व म्हशीचे वगार मिळून आले. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द कार्यवाही होण्याकरीता सदरील रिपोर्ट दिला.

**०३.** फिर्यादीने दिलेल्या रिपोर्टवरुन पोलीसांनी अप.क्र.२३/२०१५, भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. त्यानंतर सदरील गुन्ह्याचा तपास पो. हवा, श्री. मनोहर खोब्रागडे यांनी केला. त्यांनी तपासकामी घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा केला. आरोपींना अटक करुन अटक पंचनामे तयार केले. तपासाअंती आरोपींविरुध्द पुरेसा पूरावा मिळून आल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपी हजर झाल्यानंतर माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.४६ वर भारतीय दंड विधानाच्या कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये दोषारोप निश्चीत केला. सदर दोषारोप आरोपीला वाचून समजावून सांगितला असता त्याने नि.क्र.४७ व ४८ नुसार गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला चालविण्याची मागणी केली. त्यामुळे प्रस्तुतचा खटला त्यांच्याविरुध्द चालविण्यात आला.

**०५.** याकामी उपस्थित होणारे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणासहीत खालील प्रमाणे नोंदवित आहेः–

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ३०.०६.२०१५ रोजीचे ०९.०० वाजेपासून ते सायंकाळपर्यंत मौजा कुचना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे आरोपींनी एकमेकांशी संगणमत करुन त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादीची काळ्या रंगाची म्हैस व म्हशीचे वगार, एकूण किंमत अंदाजे रु.३५,५००/– ची अप्रामाणिकपणे चोरुन नेल्याचे आढळून आले आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड विधानाच्या कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०६.** आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाने एकमेव साक्षीदार म्हणून पंच साक्षीदार क्र.१ मुमताज अहमद शेख सिध्दीकी याची साक्ष अभिलेखावर नोंदविली. त्यानंतर, त्यानंतर, उर्वरित साक्षीदारांना वारंवार साक्ष–समन्स काढले असता त्यांची उपस्थिती प्राप्त होत नसल्याने दि.१७.०१.२०२६ रोजी नि.क्र.१ वरील आदेशाप्रमाणे अभियोग पक्षास साक्षीदारांचा पुरावा नोंदविण्याकरिता शेवटची संधी दिली होती. परंतू अभियोग पक्षाला साक्षीदारांची उपस्थिती निश्चीत करुन त्यांची साक्ष अभिलेखावर नोंदविता आलेली नाही. अभिलेखावर आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पूरावा मिळून न आल्याने त्यांना दि.१५.०५.२०१६ रोजीच्या नि.क्र.१ वरील आदेशान्वये फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम

३१३ अन्वयेचा जबाबातून अभिमुक्त करण्यात आले. अभियोग पक्षाचे सरकारी विधिज्ञ व बचाव पक्षाचे विधिज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

<u>मुद्दे क्रमांक १ व २ करीता</u> –

०७. आरोपींविरुध्द निश्चीत करण्यात आलेला दोषारोप आणि अभियोग पक्षाचे कथने विचारात घेता प्रस्तुतचा खटला पुर्णपणे परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारित आहे. आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता घटनेच्या दिवशी आरोपींनी एकमेकांशी संगणमत करुन त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादीची काळ्या रंगाची म्हैस व म्हशीचे वगार, एकूण किंमत अंदाजे रु.३५,५००/– ची अप्रामाणिकपणे चोरुन नेल्याचे आढळून आले, ही बाब सिध्द करण्याकरीता अभिलेखावर आलेला पुरावा विस्तृतपणे पाहणे गरजेचे आहे.

०८. अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा सिद्ध करण्याकरिता मुमताज सिध्दीकी (अ.सा.क्र.१) यास पंच साक्षीदार म्हणून तपासले असून त्याने त्याच्या साक्षीत पंचनाम्याबाबत काहीही कथन केले नाही. सदर पंच साक्षीदार हा फितुर होवुन सरतपासात पंचनाम्याबाबत काहीच सांगत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने त्याला उलटतपासात विचारता येतील असे प्रश्न विचारुन आवश्यक पुरावा आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने पंचनाम्याबाबत काहीच साक्ष दिलेली नाही. सदर साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखवला असता त्याने त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शवली आहे.

०९. वर नमूद केल्याप्रमाणे अभियोग पक्षातर्फे न्यायालयासमोर तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तो

आरोपींनी केलेल्या गुन्ह्याबाबत त्याच्या पुराव्यात काहीही कथन करत नाही. प्रस्तुतच्या प्रकरणात फिर्यादी ही महत्वाची साक्षीदार असून देखील त्यांची साक्ष अभिलेखावर नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे फिर्याद मधील मजकूर सिध्द झालेला नाही. तसेच, अभियोग पक्ष हा इतर स्वतंत्र साक्षीदार व तपासिक अमलदार यांना हजर ठेऊन त्यांची साक्ष नोंदविण्यास अयशस्वी ठरले आहे. त्यामुळे, आरोपींनी केलेला गुन्हा हा संशयापलीकडे जावून सिद्ध होत नाही.

**१०.** फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींवरील आरोप सर्व संभाव्य संशयाची शक्यता गृहीत धरुन सिध्द झाले पाहिजेत, तो पर्यंत आरोपी निर्दोष आहे हे गृहीतक मूळ तत्व आहे. परंतु प्रस्तुत खटल्यात वर नमूद केल्याप्रमाणे अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या तोंडी पुराव्याचा विचार करता, घटनेच्या दिवशी आरोपींनी एकमेकांशी संगणमत करुन त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादीची काळ्या रंगाची म्हैस व म्हशीचे वगार, एकूण किंमत अंदाजे रु.३५,५००/– ची अप्रामाणिकपणे चोरुन नेल्याचे आढळून आले, हा दोषारोप सिध्द होण्या इतपत कोणताही पुरावा अभिलेखावर दिसून येत नाही. गुन्ह्यातील दोषारोप, सबळ आणि निःसंशय पुराव्याअभावी अभियोग पक्ष सिध्द करु शकले नाहीत. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ **जयप्रकाश विक्रमा राम** व आरोपी क्र.२ **बंडु महादेव उपरे**, यांची भारतीय दंड विधानाच्या कलम ३७९ सहकलम ३४ खालील गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहेत. |

| | |
|---|---|
| २. | आरोपींचे जात मुचलके व जामीन कतबे रद्द करण्यात येतात. |
| ३. | जप्त मुद्देमाल – १) एक काळ्या रंगाची दोन सिंगे म्हैस, किंमत रु.३५०००/–, २) एक लहान काळ्या रंगाचे वगार कपाळावर पांढरा डाग असलेला, किंमत रु.५००/–, हे फिर्यादीने खरेदी केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन फिर्यादीकडे सुपूर्द करण्यात आलेली असल्याने सदरच्या जनावरांचा ताबा अपिल कालावधीनंतर फिर्यादीकडेच कायम करण्यात येतो. |
| ४. | आरोपींनी कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चे बंधपत्र देऊन अभियोग पक्षाने सदर प्रकरणात अपील केल्यास त्यात हजर राहण्याची ग्वाही द्यावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

Digitally signed by APARNA ROHIDAS DEORE
Date: 2026.08.05 17:49:49 +0530

**(ए. आर. देवरे)**

भद्रावती — प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

दिनांक– ०५.०८.२०२६ — (न्यायालय क्र.२), भद्रावती.

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | जी. डी. किटे |
| न्यायालयाचे नाव | – | प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२), भद्रावती. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | – | ०५.०८.२०२६ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | – | ०५.०८.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | – | ०५.०८.२०२६ |